मोठा पुरस्कर्ता होऊन गेला. कोरीव लेखांत त्याच्या जातीचा उल्लेख नाहीं. तथापि त्यानें वाकाटकवंशीं ब्राह्मण राजकन्येशीं केलेला विवाह लक्षांत घेतां तो ब्राह्मण कुळांत जन्मला होता यांत संशय नाहीं. प्राचीन काळीं अनुलोम विवाहच प्रचलित होते, प्रतिलोम विवाह निषिद्ध मानत. तेव्हां ब्राह्मण राजकन्येचा विवाह ब्राह्मण कुमाराशींच होऊं शके. वाकाटक सम्राट पहिला प्रवरसेन यानें चार अश्वमेध व अग्निष्टोम, आप्तोर्याम, उक्थ्य, षोडशि, अतिरात्र, वाजपेय, बृहस्पतिसव, साद्यस्क इत्यादि श्रौत याग केले होते. त्याचेंच अनुकरण या **विष्णुकुंडी** माधववर्म्यानें केलेलें दिसतें. यानें प्रवरसेनावरही ताण केली. प्रवरसेनानें चारच अश्वमेध केल्याचा उल्लेख आहे, पण या **माधववर्म्यानें** अकरा अश्वमेध केले होते, असें त्याच्या व त्याच्या वंशजांच्या अनेक ताम्रपटांत म्हटलें आहे. इतके अश्वमेध दुसऱ्या कोणत्याही भारतीय राजानें केल्याचा इतिहासांत उल्लेख नाहीं. या शिवाय त्यानें हजार अग्निष्टोम आणि सर्वमेध, बहुसुवर्ण, पौण्डरीक, पुरुषमेध, वाजपेय, षोडशी, राजसूय, प्राधिराज्य, प्राजापत्य इत्यादि श्रौत याग केले होते. त्यावरून त्याच्या धार्मिकपणाची कल्पना येते.

अकरा अश्वमेध याग करणाऱ्या राजाचें साम्राज्य तसेंच विस्तृत असलें पाहिजे असें कोणीही अनुमान करील. माधववर्म्याच्या ताम्रपटांत त्याच्या साम्राज्यांत अन्तर्भूत झालेल्या देशांचा उल्लेख येत नाहीं व त्याचे स्वतःचे ताम्रपट आन्ध्र प्रांताखेरिज इतरत्र सांपडले नसल्यानें त्यांच्या प्राप्तिस्थानावरून त्यांच्या साम्राज्याच्या विस्ताराची कल्पना करतां येत नाहीं. तथापि त्याच्या स्वतःच्या व त्याच्या वंशजांच्या ताम्रपटांतील वर्णनावरून कांहीं अनुमानें बांधतां येतात. त्याचे ताम्रपट आन्ध्रप्रांतांत सांपडले असल्यानें तो प्रदेश त्याच्या अंमलाखालीं होता यांत संशय नाहीं. याशिवाय दक्षिण कोसल (सध्यांचा छत्तीसगड) हाही त्याच्या साम्राज्यांत मोडत असावा. कारण त्याच्या दोन्ही ताम्रपटांत 'त्रिवरनगरभवनगतपरमयुवतिनन्दनः ' किंवा 'त्रिवरनगरभवनगत–परमयुवतिजन–विहरण–रतिः' असें त्याचें वर्णन केलेलें आढळतें. या वर्णनाचा अर्थ संशोधकांना लागत नव्हता. तो प्रस्तुत लेखकानें पंधरा वर्षांपूर्वी आपल्या लेखांत[1] प्रथम दाखविला. या वर्णनांत माधववर्म्यानें त्रिवरनगरांतील सुंदर स्त्रियांना आनंदित केलें किंवा त्यांच्याशीं विहार केला असें म्हटलें आहे. 'त्रिवरनगर ' म्हणजे त्रिवरराजाची राजधानी. हा त्रिवरराजा व मध्यप्रांताच्या छत्तीसगड विभागांत राजीम व फुलझर येथें ज्याचे दोन ताम्रपट सांपडले आहेत तो **तीवरदेव** हे एकच होत. हा तीवरदेव आपल्या ताम्रपटांत आपण सोमवंशी पांडवकुलांत जन्मलों असें सांगतो. त्याच्या ताम्रपटांतील अक्षरवटिकेवरून व इतर कांहीं प्रमाणांवरून तो वाकाटकांच्या कालानंतर लौकरच होऊन गेला

१ एपिग्राफिया इंडिका पु. २२ पृ. १९

असावा असें दिसतें. या राजाचा पराजय करून विष्णुकुंडी माधववर्म्यानें त्याच्या राजधानींत कांहीं काळ वास्तव्य केलें असावें असें दिसतें.

ह्या माधववर्म्याचा नातू **द्वितीय माधववर्मन्** याचा एक ताम्रपट आन्ध्रप्रांतांत सांपडला आहे. त्यांत द्वितीय माधववर्म्याला 'त्रिकूटमलयाधिपतिः' त्रिकूट व मलय पर्वतांचा अधिपति असें म्हटलें आहे. यापैकीं मलय पर्वत दक्षिणेंत म्हैसूर संस्थानांत आहे हें सर्वांस माहीत आहे. दुसरा पर्वत त्रिकूट याच्याविषयीं अनेकांनीं अनेक अनुमानें केलीं होतीं. पण सुमारें दहावर्षांपूर्वी नाशिक जवळच्या अंजनेरी गांवीं सांपडलेल्या ताम्रपटावरून नाशिकच्या पश्चिमेस पसरलेल्या पर्वतराजीस **त्रिकूट** हें नांव होतें असें निर्विवादपणें सिद्ध झालें आहे. कालिदासानें रघुवंशाच्या चतुर्थ सर्गांत रघूनें अपरान्त म्हणजे उत्तर कोंकण या देशाच्या राजाचा पराभव करून तेथील त्रिकूट पर्वताला आपला जयस्तंभ केलें असें वर्णन केलें तेंहि वरील स्थलनिश्चयाचें समर्थक आहे. तेव्हां या द्वितीय माधववर्म्याच्या अमलाखालीं दक्षिण हिंदुस्थानचा पश्चिम भाग—ज्यांत महाराष्ट्र व कर्नाटक हें प्रांत अन्तर्भूत होतात तो प्रदेश होता असें दिसतें. माधववर्म्याचा दुसरा नातु **इन्द्रभट्टारकवर्मा** याच्या वंशजाचे लेख आन्ध्र प्रांतांत सांपडले आहेत व त्यांत आन्ध्रांतील गांवें दिल्याचा उल्लेख आहे. तेव्हां इन्द्र-भट्टारकवर्मा हा आन्ध्र प्रांतांवर राज्य करीत होता असें अनुमान करतां येतें. पहिला माधववर्मा याचें साम्राज्य दक्षिण हिंदुस्थानच्या बऱ्याच मोठ्या भागावर पसरलें होतें. त्याच्यानंतर त्याच्या मुलांमध्यें किंवा नातवांमध्यें त्याच्या राज्याची वांटणी होऊन एकाला पूर्वेकडचे आन्ध्र, कोसल इत्यादि देश मिळाले व दुसऱ्याच्या सत्तेखालीं महाराष्ट्र, कर्नाटक इत्यादि देश आले असें अनुमान पंधरा वर्षांपूर्वी प्रस्तुत लेखकानें आपल्या एका लेखांत केलें होतें[1]. या विष्णुकुण्डी राजांचे लेख आन्ध्रप्रांताबाहेर सांपडले नसल्यानें त्यांचें राज्य कधीं काळीं महाराष्ट्र, कर्नाटक इत्यादि पश्चिम प्रांतावर होतें ही कल्पना संशोधकांस पटत नसे. द्वितीय माधववर्म्याच्या ताम्रपटांत त्याचें त्रिकूटमलयाधिपतिः असें वर्णन आलें आहे खरें, पण ते वस्तुस्थितिनिदर्शक नसावें; कारण हे पर्वत त्याच्या आन्ध्रदेशापासून शेंकडों मैल दूर होते असें डॉ. हुल्श यानें म्हटलें होतें. सुदैवानें याविषयींचा निर्णायक पुरावा आतां उपलब्ध झाला आहे. तो आपणांपुढें मांडतों.

समारें वीस वर्षांपूर्वी श्री. य. रा. गुप्ते यांस सातारा जिल्ह्यांतील **खानापूर** गांवीं एक अपूर्ण ताम्रपट सांपडला होता. त्यावर त्यांनीं एक त्रोटक टिप्पण या मंडळाच्या त्रैमासिकांत (त्रै. व. ८ पृ. १६३) प्रसिद्ध केलें आहे. या ताम्रपटांत माधववर्मन् नामक नृपतीनें कृष्णावेण्णा नदीकांठचें **रेट्टुरक** नांवाचें गांव जवळच्या वाड्यांसहित वैशाखी पूर्णिमेस एका ब्राह्मणास दान केल्याचा निर्देश आहे. हें गांव सातारा

१ एपिग्राफिया इंडिका पु. २२ पृ. ३०.

जिल्ह्यांत कृष्णेच्या कांठचें **रेटरें बुद्रुक** या नांवानें अद्यापि विद्यमान आहे व ताम्रपटांत उल्लेखिलेल्या बेलवाटिका, कोलिकवाटिका व वट्टरिका या वाड्या सध्यां रेटरें बुद्रुकच्या जवळ अनुक्रमें **बेलवडें, कोळें** व **वाठार** या नांवानें दिसतात हें श्री. गुप्ते यांनीं दाखविलें होतें. ताम्रपटाच्या अक्षरवटिकेवरून तो इ. सनाच्या पांचव्या सहाव्या शतकांतील असावा असें अनुमान श्री. गुप्ते यांनीं केलें होतें. तथापि हा माधववर्मा कोणत्या वंशांतील याचा उलगडा त्यांस झाला नव्हता. त्या ताम्रपटाचा पहिला पत्रा गहाळ झाल्यानें त्यांतील माधववर्म्याच्या वंशाचें व त्याच्या पूर्वजांचें वर्णन नष्ट झालें आहे. या ताम्रपटाविषयीं श्री. गुप्ते यांचें टिप्पण वाचल्यावर हा राजा राष्ट्रकूटवंशांतील असावा असें मला प्रथम वाटलें. कारण राष्ट्रकूट नृपति मानाङ्क व त्याचे वंशज दक्षिण महाराष्ट्रांत इ. स. च्या चौथ्या शतकांपासून सातव्या शतकापर्यंत राज्य करीत होते व त्यांची राजधानी सातारा जिल्ह्यांतच माण गांवीं होती हें मीं अनेक ताम्रपटांच्या पुराव्यावरून दाखविलें होतें. माधववर्म्याच्या राजवंशाविषयीं हें माझें मत मंडळापुढें चार वर्षांपूर्वी वाचलेल्या 'मानपूरचे राष्ट्रकूट' या माझ्या लेखांत मांडलें होतें. त्यानंतर हा माधववर्मा विष्णुकुंडी वंशांतील असावा अशी कल्पना मला सुचली, पण ताम्रपटाच्या अवशिष्ट भागाचें काळजीपूर्वक वाचन केल्याशिवाय या बाबतींत निश्चित मत बनवितां येईना. तेव्हां तो ताम्रपट कोठें तरी प्रसिद्ध करावा अशी निकड मीं मंडळाच्या चिटणिसांना व श्री. य. रा. गुप्ते यांना लावली. माझ्या एतद्विषयक आग्रहास मान देऊन श्री. गुप्ते यांनीं त्याच्या प्रकाशनास संमति दिली. तो ताम्रपट यथावकाश एपिग्राफिया इंडिकामध्यें श्री. गुप्ते व मी प्रसिद्ध करीत आहों.

या ताम्रपटाच्या अवशिष्ट भागाचें बारकाईनें वाचन केल्यावर तो विष्णुकुण्डी पहिल्या माधववर्म्यानेंच दिला होता या विषयीं माझी खात्री झाली. या ताम्रपटाचा पहिला पत्रा गहाळ झाल्याचें मागें सांगितलें आहेच. दुसऱ्या पत्र्यावर आरंभीं माधववर्म्याच्या वर्णनाचा शेवटचा भाग आला आहे. त्यावरून त्यानें पुंडरीक, बहुसुवर्ण व एकादश याग केले होते व सार्वभौम पदवी धारण केली होती. आणि त्याचा चातुर्वर्ण्य व चातुराश्रम्य यांस मोठा आश्रय असे अशीं माहिती आपणांस मिळते. हें वर्णन विष्णुकुण्डी पहिला माधववर्मा याच्या वर्णनाशीं जुळणारें आहे. मागें सांगितल्याप्रमाणें पुण्डरीक व बहुसुवर्ण हे यज्ञ त्या विष्णुकुण्डी राजानें केले होते हें आपणांस त्याच्या वंशजांच्या ताम्रपटांवरून ज्ञात झालें आहे. राहिलेल्या एकादश यागांचें नांव लेखकाच्या अनवधानानें प्रस्तुत ताम्रपटांत गळलें आहे. पण ते याग अश्वमेधच होते याविषयीं संशय राहात नाहीं. इ. स. च्या पांचव्या सहाव्या शतकांत दुसऱ्या कोणत्याही राजानें पुंडरीक, बहुसुवर्ण व एकादश अश्वमेध यज्ञ केल्याचा कोरीव लेखांत उल्लेख नाहीं. तेव्हां खानापूरचा ताम्रपट देणारा सार्वभौम माधववर्मा

हा अकरा अश्वमेध करणारा विष्णुकुंडी वंशांतील सुविख्यात पहिला माधववर्माच होय हें स्पष्ट होईल.

ताम्रपटांत उल्लेखिलेलीं मुख्य गांवें श्री. गुप्ते यांनीं शोधलीं होतीं. त्याशिवाय इतरही गांवें सर्व्हे ऑफ इंडियाच्या विस्तृत नकाशांत मला रेटरेंबुद्रुकच्या जवळपास सांपडलीं. मच्छदर्या, सेणवर्या, कोलिका व मलखेटक हीं गांवें रेटरे बुद्रुकच्या त्या त्या दिशांस अनुक्रमें **राजमाची, शेणोली, कोला** व **मलखेट** या नांवानें अद्यापि विद्यमान आहेत. तेव्हां हा ताम्रपट मूळचा सातारा जिल्ह्यांतील यांत मुळींच संदेह नाहीं.

या ताम्रपटानें महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासावर महत्त्वाचा प्रकाश पाडला आहे. त्यावरून असें स्पष्ट दिसतें कीं, वाकाटकांचा अस्त झाल्यावर त्यांच्या साम्राज्याचा वारसा त्यांचा नातेवाईक विष्णुकुंडी माधववर्मा याच्याकडे आला. त्यानें आपल्या शौर्य, धर्मनिष्ठा, औदार्य इत्यादि गुणांनीं त्यांची परंपरा पुढें चालविली. वाकाटक सम्राट् हरिषेण याच्या कालानंतर विदर्भाच्या मांडलिकांनीं आपल्या अधिराजा-विरुद्ध बंड करून त्याच्या सत्तेचें जूं झुगारून दिलें होतें. पण माधववर्म्यानें त्यांचा पुनः पराजय करून आपलें साम्राज्य आन्ध्र, कोसल, महाराष्ट्र, कर्नाटक इत्यादि दक्षिणेंतील बहुतेक देशांवर पसरविलें. तो स्वतः अत्यंत धार्मिक असल्यानें त्यानें सार्व-भौमत्व निदर्शक अकरा अश्वमेध केले; इतकेंच नाहीं, तर हजार अग्निष्टोम, आणि पुंडरीक, बहुसुवर्ण, वाजपेय, राजसूय, पुरुषमेध इत्यादि अनेक श्रौत याग करून सर्वत्र सनातन धर्माचें वर्चस्व प्रस्थापित केलें. त्यानें ब्राह्मणांस धार्मिक कृत्यांच्या अनुष्ठानार्थ अनेक ग्राम दान दिले होते. यापुढें दक्षिण हिंदुस्थानांतील सुविख्यात अशा प्राचीन सम्राटांमध्यें **विष्णुकुण्डी** पहिल्या **माधववर्म्याची** गणना केली जाईल.

विष्णुकुंडी वंशाचें महाराष्ट्र व विदर्भ या देशांवरील राज्य माधववर्म्याच्या काला-नंतर फार वर्षें टिकलेलें दिसत नाहीं. माधववर्म्यांचा एक ताम्रपट त्याच्या कार-कीर्दीच्या ४० व्या वर्षीं दिला होता. त्यावरून त्यानें दीर्घकाल राज्य केलेलें दिसतें. त्याच्या अगोदर त्याचे पुत्र निवर्तले असल्यानें त्याच्या निधनानंतर त्याच्या नातवां-मध्यें त्याच्या विस्तृत राज्याची वांटणी झाली. **द्वितीय माधववर्मा** नामक एका नातवास महाराष्ट्र, कर्नाटक इत्यादि पश्चिमेकडील देश व **विक्रमेंद्रवर्मा** नांवाच्या दुसऱ्या नातवास आन्ध्र कोसल इत्यादि पूर्वेकडचे देश मिळालेले दिसतात. द्वितीय माधववर्म्याला त्याच्या ताम्रपटांत ‘ त्रिकूट–मलयाधिपतिः ’ म्हटलेलें मागें सांगितलें आहेच. द्वितीय माधववर्म्याच्या वंशजांचे ताम्रपट महाराष्ट्र–विदर्भांत अद्यापि सांपडले नाहींत. यानंतरच्या काळांत दक्षिण महाराष्ट्रांत पुनः **राष्ट्रकूटांनीं** आपलें डोकें वर काढलें. उत्तर महाराष्ट्र व विदर्भ या प्रांतांत माहिष्मतीच्या कलचुरींची सत्ता

इ. स. ५५० च्या सुमारास प्रस्थापित झाली. त्यावरून विष्णुकुंडींचें साम्राज्य माधववर्म्यानंतर लवकरच संपुष्टांत आलें असावें. आन्ध्र प्रांतांत मात्र त्यांचें राज्य इ. स. च्या सातव्या शतकापर्यंत टिकून होतें. सातव्या शतकाच्या आरंभीं महाप्रतापी चालुक्यनृपति द्वितीय पुलकेशी यानें दक्षिणेंतील इतर राजांप्रमाणें विष्णुकुंडींचाही पराजय करून त्यांचें राज्य आपल्या साम्राज्यांत समाविष्ट केलें. पुढें त्यानें आन्ध्र प्रांतांत **वेंगी** येथें चालुक्यांची निराळी गादी स्थापून तिजवर आपल्या विष्णुवर्धन नामक भावास बसविलें हें इतिहासज्ञांस माहीत आहेच. याप्रमाणें खानापूरच्या ताम्रपटानें महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासावर कसा नवीन प्रकाश पडतो तें यथामति दाखविलें आहे. या राजाचे ताम्रपट कोणाच्या संग्रहीं असल्यास त्यांनीं ते अवश्य प्रसिद्ध करावे.

विष्णुकुंडी राजांची वंशावळ पुढें दिली आहे—

विक्रममहेंद्र
|
महाराज गोविंदवर्मन्
|
सार्वभौम प्रथम माधववर्मन्
|
देववर्मन् — महाराज द्वितीय माधववर्मन्

विक्रमेन्द्रवर्मन् — महाराज इन्द्रवर्मन् — महाराज विक्रमेन्द्रवर्मन्

---

३ सिन्नर येथील कांहीं देवालयें व मूर्ती

लेखकः– **य. रा. गुप्ते**, बी. ए., एम्. आर. ए. एस. (लंडन), सभासद भा. इ. सं. मं. पुणें, सं. सभासद राजवाडे सं. मं. धुळें, माजी असि. सर्व्हेअर, हिंदु व बौद्ध इमारती, लाहोर.

नासिक* जिल्ह्यांतील सिन्नर हें एक प्रत्येक महाराष्ट्रीयानें, कलावंतानें व ड्रॉइंग शिक्षकानें अवश्य पहाण्यासारखें ठिकाण आहे. नासिकरोड स्टेशनच्या बाजूनें जा किंवा संगमनेरच्या रस्त्यानें प्रवेश करा हें पूर्ववैभवाचें ठिकाण दृष्टीस पडतांच अत्या-

---

* संमेलन ३५ वें.

नंद होतो. ‘ **शिंदीनगरचें** ’ ‘ सिन्नर ’ हें रूपांतर आहे. शेतकरी लोक अद्याप यास ‘ शिंदरच ’ म्हणतात. याचें दुसरें सुप्रसिद्ध नांव **श्रीनगर** असून **भिल्लम** पांचवापर्यंत हें यादवांच्या राजधानीचें ठिकाण होतें. भिल्लमाच्या वेळीं राजधानी **देवगिरीस** गेली. भिल्लमकालीन अनेक देवालयें व तत्पूर्वीचीं अनेक देवळें येथें असून त्यांत व त्यांच्या आसपास शेंकडों सुंदर मूर्ती अद्याप पूर्ववैभवाची आठवण देतात. बहुतेक शिवालयें असून त्यांत गोंदेश्वर, ऐश्वर्येश्वर, चितळेश्वर, नागेश्वर, विट्ठलेश्वर, ब्रह्मेश्वर व पाताळेश्वर हीं प्रमुख होत. कमींतकमी हीं बारा होतीं असें सांगतात. त्यांतल्या त्यांत गोंदेश्वर व ऐश्वर्येश्वर हीं अलौकिक असून पु. व. सं. खात्याकडून संरक्षित आहेत. **गोंदेश्वराचें** ‘ आम्हीं ’ घेतलेलें एक छायाचित्र श्री. केशवराव पाध्ये यांनीं ‘ हेमाद्रि ’ नामक पुस्तकांत पृ. ३५२ व ३५३ चें दरम्यान दिलें आहे. त्यावरून त्याच्या उत्कृष्ट कलेचीं व शिखराची कल्पना येईल. त्यांत मूर्ती उत्कट रीतीनें दिसत नसल्यामुळें इतर छायाचित्रें सोबत ठेविलीं आहेत. हीं सिन्नरचीं देवालयें हेमाडपंती धर्तीचीं असून या धर्तीच्या मध्यकालांतील आहेत. अर्थात यांत काटकोन त्रिकोण यांस जेवढें महत्त्व आहे त्याहून थोडें कमी त्यांतील मूर्तींस दिलेलें आहे. त्या रेखीव असून त्यांतील आविर्भाव ठळक रीतीनें दाखविले आहेत. दुसरें छायाचित्र सह्याद्रिकारांनीं कृपेनें ऑगस्ट १९४७ च्या अंकावर दिलें आहे. त्यावरून मंडपाचीं चांगली कल्पना येते. हेमाडपंती पद्धत हिंदुस्थानांतील आर्यांच्या धर्तीचा एक प्रकारें विपाक आहे. शुद्धधर्ती ओरिसांत **भुवनेश्वर** येथें पहावयास मिळते. सर जेम्स फर्ग्युसन कृत “ A History of Indian and Eastern Architecture – Vol. II 1910, 95P.P. 105 व आमचें “ The Times of India ” ता. २४–४–१९४८ च्या अंकांतील ता. १६ एप्रिल १९४८ चें पत्र पहा. शिखरांच्या व मूर्तींच्या बाबतींतहि तुलना करण्यासारखी आहे. भुवनेश्वर येथील शिवालयांचीं शिखरें कायम आहेत. **परशुरामेश्वर** व **मुक्तेश्वर** एक प्रकारचीं, **लिंगराज** दुसऱ्या प्रकारचें व राजाराणी दोन प्रकारांच्या मिलाफाच्या मूर्तीचें. मूर्तींत फारसा भेद नाहीं. सिन्नरच्या **ऐश्वर्येश्वराचें** शिखर नष्ट झालें आहे. पण गोंदेश्वराचें अस्तित्वांत असून विशिष्ट धर्तीचें आहे. ओरिसामधील देवालयांहून व दक्षिणेंतील रथपद्धतीहून निराळ्या पद्धतीचें आहे. पण बाहेरील आकारावरून तें पूर्व चालुक्य पद्धतींचा परिपाक आहे. दोन स्थलांच्या मूर्तींतही बारीक रीतीनें पहातां भिन्नत्व दिसतें. भुवनेश्वरीं ठराविक प्रकार दिसतो तर सिन्नरास निरनिराळें सुरम्य देखावे असून ओजस्वीताहि जास्त दृष्टोत्पत्तीस येते.

सिन्नर येथील देवालयें हेमाडपंती देवालयांच्या मध्यकालाचीं असल्यामुळें त्यांतून काटकोन, त्रिकोण वगैरे ड्रॉइंगच्या दृष्टीनें महत्त्वाच्या नमुन्यांएवढेंच वैशिष्ट्य

त्यांतील मूर्तीस नसलें तरी फार कमी खास नाहीं. या फार अभ्यसनीय आहेत. इ. स. १९१० ते १९१७ पर्यंत ७।८ वर्षें वगळून आम्हीं यांचा वर्षांतून ८–१० दिवस तरी विचार करीत असूं. त्यांतल्या त्यांत गोंदेश्वराच्या देवालयांत निम्मा वेळ जाई. अनेक छायाचित्रें आम्हीं घेतलेलीं आहेत. त्यांच्या कांहीं निगेटिव्हज् सोबत आहेत. प्रिन्टस् काढविण्यास अवसर मिळाला नाहीं. तरी कांहीं आणले आहेत. इतक्या वर्षें निरीक्षण करूनहि आमची तृप्ति झाली नाहीं. खांबावरील एका मुकुट घातलेल्या व डावा हात दुसऱ्या प्रतिमेवर ठेविलेल्या मूर्तीवरून वगैरे शिल्पकामाची स्थूल कल्पना येईल. गाभाऱ्यापुढील मंडपांत आंतल्या बाजूस घरगुती देखावे आहेत. त्यांत आविर्भाव मार्मिक आहे. बाहेरील बाजूस देवळ्यांतून वगैरे सार्वजनिक स्वरूपाचे कैक देखावे आहेत. या नासिक व नगर जिल्ह्यांतील हेमाडपंती देवालयांतून बहुधा बाहेरच्या बाजूस समुद्रमंथन केलेलें असतें. त्याप्रमाणें तें गोंदेश्वराच्या बाहेरील बाजूस आहे. तसेंच हत्तीची रांगहि फार शोभायमान दिसते. तांत्रिक कलेचा अवशेष म्हणूनहि एक बीभत्स मूर्ति दृष्टोपत्तीस येते. पण ती बाहेरच्या बाजूस आवारांत मोकळीच पडलेली कांहीं वर्षें तरी होती. नाचण्या बागडण्याचे देखावेहि अनेक आहेत. परंतु नगर जिल्ह्यांतील कर्जत येथील व सटाण्याजवळील देवळाण्याइतके ते बीभत्स नाहींत. या गोंदेश्वराच्या देवालयांतील कांहीं सुंदर प्रतिमांचा विध्वंस कांहीं वर्षांपूर्वीं सैनिकांनीं केला. विशेष नांवाजण्यासारखे कांहीं देखावे नंदिगृहाच्या जवळच बाहेरील बाजूस आहेत. त्यांत रामायणांतील भाग चित्रित केला आहे. हे देखावे निश्चित करण्यास सिन्नरासच सबंध वर्ष दोन वर्षें घालविलीं पाहिजेत. पण इतका अवधि कोणास मिळणार ? तरी ज्या प्रेक्षकांस वेळ सांपडेल त्यांनीं या सिन्नरच्या गोंदेश्वराच्या देवालयांतील देखावे अभ्यासण्याजोगे आहेत. मागील बाजूस विष्णूची मूर्ति आवेशयुक्त असून देवालयाच्या प्रेक्षकांच्या डाव्या हाताच्या मूर्ती प्रेक्षणीय आहेत. गोंदेश्वराचें देवालय फर्ग्युसनच्या मतें इ. स. च्या १२ व्या शतकाच्या पूर्वार्धांतील आहे.[१]

ऐश्वर्येश्वराच्या देवालयाचें शिखर दुर्दैवानें नष्ट झालें असलें तरी प्रवेशद्वाराचें वरील मकराची मूर्ति अभ्यसनीय आहे. तीवरून देवालयाचा काल निश्चित करतां येतो. सर्वसाधारण रीतीनें असें सांगतां येतें कीं मकराचें पुच्छ जितकें आंखुड तितका काल अगोदरचा. ऐश्वर्येश्वराच्या देवालयांतील मकराचें शेपूट अगदीं पूर्वकालांतीलहि नाहीं व उत्तर कालांतलेंहि नाहीं. घारापुरीच्या एका लेण्यांतील सुसर (मकर) त्या अगोदरची असून परळीच्या देवालयांतील नंतरची आहे. ऐश्वर्येश्वराच्या देवळांतील खांबावरील मूर्ती पाणी वाहून वाहून बऱ्याच खराब झाल्या आहेत.

---

१ A History of Indian and Eastern architecture Vol. 1910. p. 144.

तरी अस्तित्वांत असलेल्या गोंदेश्वराच्या शिवालयाच्या इतक्या सुंदर नाहींत. मात्र खांबाचें नक्षीकाम रेखीव आहे. या ऐश्वर्येश्वराचें मोठें छायाचित्र एका वर्षीं भा. इ. सं. मं. त पहाण्यास ठेवलें होतें. ते महाराष्ट्र चित्रकार मंडळाच्या आर्ट गॅलरींत संरक्षित केलें आहे.

सिन्नरास इतस्ततः विखुरलेल्या मूर्ती इतक्या आहेत कीं त्यांची यादी करण्याचें काम बरेंच दुर्घट आहे. नद्या तीन आहेत. १ देवनदी २ शिवनदी व ३ सरस्वती. ऐश्वर्येश्वर सरस्वती नदीचें कांठीं आहे. इतरहि दोनतीन देवालयें आहेत. आणखी देवळांतील प्रतिमा नदी काठीं ठिकठिकाणीं भितींत बसविलेल्या आहेत. उदाहरणार्थ एक छायाचित्र सोबत ठेवतो. ब्रह्मेश्वराच्या देवालयांतील व त्या बाहेरील कैक मूर्तीं अभ्यासण्याजोग्या असून त्यांचीं छायाचित्रें घेण्यासारखीं आहत. फिरतीवर असणाऱ्या अम्मलदारास हें काम बरेंच जड पडतें. फिल्मा किंवा कांचा तरी किती बरोबर ठेवणार? डझन दोन डझन प्रत्येक खेपेस ठेवीत होतों. एक दोन ठिकाणीं शेषशायी नारायणाच्या मोठ्या सुंदर प्रतिमा आहेत. त्यांचीं छाया चित्रें घेणें जमलें नाहीं.

गौळीबोवा म्हणून सिन्नरास एक प्रसिद्ध देवस्थान आहे. अभीर गुरें पाळीत. नासिकच्या लेण्यांत त्यांच्या ईश्वरसेनाचा लेख आहे. मुंबई गॅझिटीअर व्हा. १६ नासिक पृ. ५७९ पहा. पण गौळीराजे हें नामाभिधान खानदेश व नासिक जिल्ह्यांत यादवांस लावितात. तेव्हां गौळीबोवा म्हणजे यादवांपैकीं सुप्रसिद्ध राजपुरुष. त्याचीं योग्यता या गांवी देवाएवढी झाली. हा गौळीबोवा एक अवाढव्य दगडाची प्रतिमा आहे. येथें शेंकडों नारळ फुटत असतात. सिन्नरास पांचव्या भिल्लम्मा एवढा सुप्रसिद्ध राजा झाला नाहीं. तो सार्वभौम होता व त्याच्या वेळींच यादवांची राजधानी देवगिरीस गेली. तेव्हां हा प्रचंड गौळीबोवा त्याचेंच द्योतक असणें फार संभवतें. प्रतिमा मात्र सुबक नाहीं. ओबडधोबड आहे. ती नंतरचीहि असणें संभवनीय आहे. हा गौळीबोवा आहे त्या ठिकाणीं पूर्वीं एक सुंदर व भव्य हेमाडपंती देवालय असलें पाहिजे. या देवळांची अशी एक ढोबळ खूण आहे कीं त्यांच्यासमोर जागा असल्यास एक मोठी विहीर असते नाहीं तर तळाव असतो. गोंदेश्वरासमोर तळाव आहे. स्नान करून देवास पाणी वगैरे घालण्यास तळाव किंवा विहीर सोयीची पडते. गौळीबोवासमोर तळाव–विहिरीच्या निशाण्या आहेत. आसपास विखुरलेल्या अनेक मूर्तीहि आहेत. हा बोवा सरस्वती नदीपासून फारसा दूर नाहीं. सरस्वतीपासून बोवाच्या ठिकाणापर्यंत अनेक प्रतिमा व त्यांचें अवशेष आहेत. कांहीं मूर्ती मे. कलेक्टरसाहेब यांस विनंती करून त्या जमविणाऱ्या व पूजणाऱ्या बोवाचा थोडाबहुत विरोध असूनहि मामलेदार कचेरींत आम्हीं नेवविल्या. लहानसें अजब घर तेथें बनविलें म्हणा ना? हें करण्याचा मुख्य उद्देश

त्यांचें संरक्षण व्हावें हाच होय. सर्वच मूर्ती मुंबईस प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्यें नेणें शक्य नाहीं व इष्टहि नाहीं; कारण त्यांचें स्थानिक महत्त्व जास्त असतें. याच रीतीनें नेवाशाच्या मूर्ती आम्हीं तेथील मामलेदार कचेरींत नेवविल्या. पूर्वी सुलतानपूर जिल्ह्यांतहि हाच उपाय आम्हीं योजिला होता. भिल्लमठ म्हणून ठिकाण देशमुखाच्या चौदाचौकी. वाड्यांत आहे. हा मठ महानुभाव पंथाचा आहे. मागें एका प्रसंगीं याचें वर्णन केलेंच होतें. पण मूर्तीच्या दृष्टीनें त्यास महत्त्व नाहीं.

बऱ्याच प्रतिमा सरस्वती नदीच्या कांठीं आहेत हें वरील वर्णनावरून ध्यानांत आलेंच असेल. या नदीचे पाट आहेत. त्यांच्या कांठींहि प्रतिमा आहेत. सिन्नरच्या देवनदी, शिवनदी व सरस्वती यांपैकीं पिण्यास पाचक व निरुपद्रवी पाणी सरस्वती नदीचेंच असल्यामुळें तिच्या कांठीं लोक जास्त वावरत व एवढ्याचकरितां देवालयें व मूर्ती तिच्याच आसपास अधिक आहेत. त्यांचा सूक्ष्म अभ्यास करणें जरूर आहे.

ठिकठिकाणीं सिन्नरास मूर्ती पडल्या आहेत हें वर दर्शविलेंच आहे.

जुन्या तटबंदी शेजारी एक मोठी विहीर आहे. तिच्या कांठीं एक मूर्ति आहे. तिचें छायाचित्र सोबत आहे. सिन्नरच्या उत्तम प्रतिमेंत तिची गणना करितां येणार नाहीं. तथापि तिचें वर्णन करणें जरूर आहे. डावा पाय बैठकीवर आडवा असून उजवा त्रिकोणाकृति मोकळा सोडला आहे. नाक, डोळे नीट कोरलेले नाहींत. मुकुट मध्यमप्रतीचा आहे. स्तन उन्नत असून—हा प्रकार सार्वत्रिक असल्याचे 'JRAS त' दाखविलें आहे.—मध्यम वयाच्या स्त्रीस शोभणारे आहेत. त्यांवर हार विलसत आहे. गळ्यांत साज आहे. हातांत बाजूबंद आहेत. कमरपट्टा चांगला आहे. पायांत सांखळ्या आहेत. या प्रतिमेचें वैशिष्ट्य म्हणजे तिचें वाहन आहे. पिसारा पसरलेला असून स्पष्ट आहे. यावरून ही मूर्ति ब्राम्ही होय.

ही प्रतिमा इ. स. च्या बाराव्या शतकांतील दिसते.

दुसरी एक देवीची मूर्ति सरकारी बंगल्याचे मागील बाजूस शिवनदीचे कांठीं आहे. डावा पाय आडवा असून उजवा मोकळा सोडला आहे. अनेक कमरपट्टे खोदलेले आहेत. मुद्रा उग्र असून मुकुट साधाच आहे. खालीं उजव्या पायाजवळ वाहन खोदलेलें आहे. व्याघ्र कां सिंह निश्चित करवत नाहीं. व्याघ्र गृहीत धरल्यास मूर्ति अंबेची होईल. वाहन सिंह असल्यास ती दुर्गेची होईल.

ही प्रतिमा इ. स. च्या बाराव्या तेराव्या शतकांतील दिसते. तिच्या शेजारी सांपडलेली दुसरी एक त्रुटित प्रतिमा या कालाच्या अगोदरची ठेवलेली आहे. छायाचित्र पहा. एकूण हीं सिन्नरचीं शिवालयें वास्तुशास्त्रदृष्ट्या अभ्यसनीय असून त्यांतील देखावे निश्चित करण्यासारखे आहेत. त्यांबरोबरच मूर्तीचा अभ्यास बारीक रीतीनें करण्यासारखा आहे. या लेखाचा मुख्य उद्देश तरुण व होतकरू अभ्यासकांच्या दृष्टोत्पत्तीस हीं वैशिष्ट्यें आणण्याचा आहे. तो सफल होवो.

सिन्नरच्या देवालयांचा वास्तुशास्त्राच्या दृष्टीनें थोडाफार विचार झालेला आहे. आम्हींहि राजवाडे पुण्यतिथीनिमित्त इतर शिवालयांच्या चर्चेबरोबर याची माहिती दिलेला लेख धुळयास धाडला होता. तथापि मूर्तीच्या दृष्टीनें कोणी सूक्ष्मदृष्ट्या विचार केलेला नाहीं. यास्तव हा लेख सादर केला आहे.

---

४ सोरटी सोमनाथाचे दरवाजे

[श्री. चिं. ग. कर्वे, बी. ए., पुणें.]

सोमनाथाच्या* देवळाचे दरवाजे **महंमूद गझनी** यानें इ. स. १०२५ मध्यें जे काबूलला नेले ते परत आणून मोठ्या समारंभानें देवळास बसविण्याची मोठी पद्धतशीर योजना गव्हर्नर जनरल **लॉर्ड एलेनबरो** यानें जी केलेली आपण इतिहासांत वाचतों तिचे पडसाद त्या काळीं महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतहि उठलेले मोडी कागदपत्रांवरून दाखवितां येतात.

महंमुदानें या देवालयांतून जी बरीच लूट नेली तींत देवळाच्या दरवाजाची एक जोडी असून ती त्याच्या कबरस्थानाला बसविण्यांत आली असें सांगतात. तसेंच शंकराच्या पिंडीचा तुकडा गझनीच्या जुम्मा मशिदीची पायरी म्हणून बसविला अशीहि आख्यायिका आहे. पण प्रसिद्ध मुसलमान इतिहासकार **फेरिस्ता** यासंबंधीं कांहींहि उल्लेख करीत नाहीं. तथापि ब्रिटिशांनीं अफगाण राजकारणांत नसती ढवळाढवळ करून **दोस्तमहंमदाला** पदच्युत केलें तेव्हां अफगाण लोक खवळले व त्यांनीं इंग्रज सैन्याची कत्तल करून मोठी नामुष्की त्यांच्या पदरांत बांधली. पण याचा सूड म्हणून चांगल्या इंग्रज सेनापतींना धोका पत्करूनहि पुन्हां लगेच तिकडे मोहिमेवर पाठविण्यांत आलें व त्यांनीहि अफगाणिस्तान जिंकून अपयश धुवून काढलें (१८४२). लॉर्ड एलेनबरोनें या विजयाचें स्मारक म्हणून महंमुदाच्या कबरीला लावलेले सोमानाथाचे चंदनी दरवाजे मुद्दाम परत आणविले व त्यांची समारंभानें पुन्हां स्थापना करण्याविषयीं मोठ्या भारदस्त आणि उत्तेजनक भाषेंत जाहीरनामा काढला. आठशें वर्षांपूर्वी महंमुदानें जो हिंदुजनतेचा भयंकर अपमान केला त्याचा सूड उगविण्याचा सूर त्यांत होता. सरहिंद, राजपुताना, माळवा, आणि गुजराथ या प्रदेशांतील राजेरजवाडे व जहागीरदार यांना मोठ्या समारंभानें आणि सन्मानानें हे दरवाजे सोमनाथाला नेण्याच्या या योजनेंत उत्साहानें सहकार्य करण्याविषयीं पाचारण केलें होतें.

---

* संमेलन ३५ वें.

मंडळांतील **लेले दप्तर** तपासतांना या फर्मानाच्या दोन मोडी नकला मिळाल्या; एकांत "श्री सोमनाथाचे देवालयाचे चंदनाचे दरवाजे गजनीचे सुलतान महंमद यांचे कबरेंतून काढून आणून श्रीचे देवालयास परत करण्याबाबत" जें गव्हर्नर जनरलनें निरूपणपत्र लिहिलें आहे तें मुंबईच्या गव्हर्नर इन् कौन्सिलनें **मलठणच्या पवार** जहागीरदारास मरकूम केलें आहे. असेंच दुसरें पत्र **गणपतराव रामचंद्र कानडे** यांना गेल्याचें सांपडतें. यावरून महाराष्ट्रांतीलहि अगदीं लहान सहान हिंदु जहागीरदार–इनामदारांना इंग्रज **सरकारनें धर्माच्या** नांवाखालीं आपल्या विजयोत्सवांत सामील करून घेतलेलें दिसतें.

नकलेची नकल

"साहेब मुषफक मेहेरबान दोस्ता मल्हारराव **पवार मलठणकर** सलामत

छअर्जासौब **राबर्टकीथ प्रींगल** साहेब बाहादूर परसीयान सक्रटरीनि॥ सरकारबाद सला॰ खैरयेत आज्याम अंकी येथील खैरसलाह जाणून आपली खुषी हमेशा कलमी करीत जावी दिगर **श्री सोमनाथाचे देवालयाचे** चंदनाचे **दरवाजे** गजनीचे सुलतान महंमद याचे कबरेंतून काढून अणून श्रीचे देवालयास परत कर्ण्याबाबद नबाब मुस्तताब मोला अलकाब अशरफल अशराफ रैट हनराबल गवरनर जनराल साहेब बाहादूर फर्मा फर्माये दारुन अमोर इंदिया याणी **हिंदूराजे** व सरदार यास जे निरुपण पत्र लिहिले आहे ते गवरनर जनराल साहेबाचे हुकूमाप्रमाणें बंदीगान आली नबाब मुस्तताब हजरत हनराबल गवरनर साहेब बाहादूर दर इजलास कौंसल याचे आज्ञेवरून आसाहेबास मरकूम केले आहे. वरकड हरहामेशा खतखदूर्दे पाठवून दिल अराम करीत जावे र॥ छ ५ माहे जिलकाद सु॥ सलास आबैन मया तैन व अलफ मु॥ तारीख २ डिसेंबर सन १८४२ इसवी ज्यादा काय लिहिणें प्यार कीजे हे किताबत रुजु रामचंद्र विठल चिटणीस"

सही इंग्रजी

[अशाच मजकुराचें पत्र गणपतराव रामचंद्र कानडे यांना आलेलें आहे.]

पण हे दरवाजे सोमनाथाला न पोंचतां आग्र्यास धूळ खात पडून राहिले. याचें कारण लॉर्ड एलेनबरोचा हा हिंदुदेवस्थान–जीर्णोद्धाराचा उद्देश वरिष्ठ सरकारला गरमुत्सद्दीगिरीचा व मूर्खपणाचा वाटला. यामुळे मुसलमान जनतेचीं मनें दुखावलीं जाऊन हिंदुमुसलमानांत वितुष्ट उत्पन्न केल्याचा दोष पदरीं येईल! शिवाय हे दरवाजे सोमनाथाचे तरी खरे म्हणून कशावरून? ते चंदनाचे तर नव्हेतच पण चांगल्या लांकडाचेहि दिसत नाहींत. अशा तऱ्हेच्या शंकाकुशंका निघण्यास वेळ लागला नाहीं. तेव्हां ते १८४८ सालापावेतों तरी आग्र्याच्या किल्ल्यांत पडले होते असें 'तीर्थयात्रा प्रबंध' या प्रवासवर्णनाच्या ग्रंथावरून दिसतें. विंचूरकर घराण्यांतील श्रीमंत रघुनाथराव हे आपल्या उत्तर हिंदुस्थानांतील यात्रेंत आग्र्यास गेले होते. तेथें त्यांनीं

हे दरवाजे पाहिले (इं. स. १८४८). “ रघुनाथराव हे आग्र्याचा किल्ला पहाण्यास गेले होते, तेव्हां त्या किल्यांत सोरटी सोमनाथ म्हणून जें बारा ज्योतिर्लिंगापैकीं एक ज्योतिर्लिंग आहे, त्याच्या देवालयाचे मोठाले भव्य असे चंदनी दरवाजे होते, ते त्यांनीं पाहिले. हे दरवाजे सरासरी आठशें वर्षांपूर्वी सुलतान महंमुदनामें मुसलमान बादशहानें त्या देवाच्या देवळाचा विध्वंस करून आपल्या गिझनी नांवाच्या राजधानीस नेऊन लाविले. पुढें इसवी सन १८३९-४० या सालीं इंग्रेज सरकारची अफगाणिस्तानावर मोहिम झाली. त्या प्रसंगीं अफगाण लोकांचा पराभव करून इंग्रज सरकारनें मोठ्या मुर्दुमकीनें हे दरवाजे गिझनीहून परत आणून आग्र्याचें किल्ल्यांत ठेविले. ते पुनः सोरटी सोमनाथाचें देवळास लावावयाचे म्हणूनहीं त्यावेळीं लोकवार्ता होती. याप्रमाणें मुसलमान लोकांनीं हिरावून नेलेला नकशा आठशें वर्षांनीं हिंदुस्थानास परत आणून देण्याचें यश इंग्रज सरकारनें संपादिलें.” असें वर्णन विंचुरकरांचे त्यांच्याबरोबर प्रवासास गेलेले आश्रित व पुण्याचे कै. लक्ष्मण गणेशशास्त्री **लेले** यांचे वडील यांनीं या पुस्तकांत केलें आहे.

आतां हे दरवाजे कोठें असतील? सोरटी सोमनाथाचा जीर्णोद्धार करण्याची भाषा सध्यांचे हिंदी संघ सरकार बोलत आहे. तेव्हां या वेळीं या दरवाज्याचा शोध लागून पुन्हां शहानिशा व्हावी.

---

५ अक्कलकोट – जोशी धर्माधिकारी

[श्री. शं. ना. वत्सजोशी]

मागें शि. च. सा. खं. ५ ले. ९५८ ह्या महजरकागदावरून महजर लिहिण्याच्या पद्धतींतील कांहीं माहिती त्या महजराच्या प्रारंभींच दिली आहे. पुढें दिलेल्या पत्रांवरून मुद्रा कोठें व कोणाच्या पत्रांवर उठवावयाच्या, जमिनीचें माप सांगण्याच्या पद्धतींतील एक विशेष काय, जकातीचे दर काय इत्यादि माहिती मिळत आहे. विशेषतः ले. ३ ह्या निर्णयपत्रावरून तसें पत्र लिहिण्याच्या व्यवस्थेंतलि कांहीं रीती लक्ष्यांत येतात. व बाळबोधींतून मोडी अक्षराचें वळण कसा मुक्काम व प्रवास करीत चाललें आहे, कोणच्या अक्षरांत काय व कसा बदल होत होत लपेट घेतली जात असे ह्याचाही एक प्रकार ह्या निर्णयपत्रावरून आढळून येतो.

हे एकंदर कागद १७ आहेत. पैकीं ३ फारसी वगळून १४ पैकीं ६ कागद पुढें दिले आहेत. हे कागद अक्कलकोटचे श्री. गुंडो श्रीनिवास ग्रामजोशी ह्यांजकडून तेथें गेलों असतां मिळाले. व ह्याबद्दल श्री. गुंडोपंत व त्यांची वडील मंडळी ह्यांचे आभार मानण्यांत आनंद वाटत आहे.

पुढें दिलेल्या सहा कागदांपैकीं पहिले ३ कागद शिवकालांतील असले तरी अदिलशाहींतील आहेत; आणि पुढले तीन पहिले फत्तेसिंग भोसले यांचे आहेत. कागद सर्व असल आहेत. जमिनीचें माप सांगतांना एके ठिकाणीं, ठिकणें ३ व तुक्म म्हणजे बीं, ज्या जमिनीला ४ कुडो ज्वारी लागते ती जमीन असें सांगितलें आहे. (क्र. २), आणि दुसरे ठिकाणीं अर्धा शेर अद् सेर – जमिन इनाम दिल्ही असें सांगून अर्धशेर म्हणजे ६० बिघे, ही स्पष्टताहि तेथें केली आहे. आतांपर्यंत जमिनीचे मापांत, नांगर, बाण, दोरी, परतनें, टका, रुका, खंडी, टाक, बिघा, एकर, इत्यादि नांवें आलीं आहेत. पण शेर, अर्धाशेर ही मोजणी येथें नवीन वाटते. (क्र. ५, ४). क्र. ४ मध्यें ८॥· "आदेसर" ह्या शब्दापूर्वीं 'वजन' हाहि शब्द आला आहे! एकाच देणगीचीं चार पांच पत्रें–घेणारा, गांव-मोकदम, देशमुखदेशपांडे, देशाधिकारी अशा चारपांचजणांना पाठविलेलीं असतात. त्यांतील मोकदमास लिहिलेलें सनदपत्र तें 'आज्ञापत्र' होय. तसेंच देशाधिकारी व देणगी घेणारा ह्या दोघांस मात्र लिहिलेल्या सनदपत्राच्या **पाठीमागें** व पाठीमागच्या पहिल्याच दोनतीन ओळींच्या प्रारंभीं फत्तेसिंगाची मुद्रा उठवावयाची; देशमुख – देशपांड्यांना पाठविलेल्या सनदपत्रावर **प्रारंभीं** व पहिल्या ओळींना लागून, ती मुद्रा उठवावयाची आणि आज्ञापत्रावर **श्रीकाराखालींच** मुद्रा उठवावयाची अशी पद्धत असे. म्हणजे पत्रांत मुद्रा कोठें उठविली आहे यावरून तें पत्र ज्याला पाठविलें त्याच्याशीं पत्र पाठविणाराचा संबंध बरोबरीचा, श्रेष्ठ कीं कनिष्ठपणाचा आहे हें अंदाजतां येतें.

वर लिहिल्याप्रमाणें ह्यांतील क्र. ३ चें निर्णयपत्र हें सर्वांत महत्त्वाचें आहे. ह्या पत्रावरून निर्णयपत्रें लिहिण्याचा एक प्रकार विस्तृतपणें ध्यानीं घेण्याजोगा आहे. तुकणभट जोसी व कासीभट ग्रामोपाध्याय ह्या दोघांमध्यें कांहीं धर्मकृत्यांबद्दल भांडण होतें. त्याचा शेवटीं असा निर्णय झाला कीं, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, गुरव, सोनार इत्यादि ज्ञातींच्या घरीं जोसपण व भटपण ज्यानें करावयाचें त्यानेंच गांवसंबंधीं अभिषेक, पूजा, होळीपूजा, विजयादशमीची शमीपूजा इत्यादि कृत्यें करावीं. आणि ऊर-उपाध्यायानें म्हणजे गांव-उपाध्यायानें गांवांत व पेठेंत ब्राह्मणांचे घरीं पुण्याहवाचन, प्रायश्चित्त, निबंधपूजा इत्यादि धार्मिक वृत्तिकृत्यें करावींत. गांवकरी ब्राह्मणांच्या घरींहि जोसपणाची कांहीं वृत्ति म्हणजे धर्मकृत्यांतर्गत घटिकाप्रतिष्ठा, लग्नपत्रिका अशीं कांहीं कृत्यें करून, त्यासंबंधीची प्राप्ती ही घ्यावयाचीच आहे; पण दोहोंत भेद केला आहे. म्ह० गांव–जोशी व गांवउपाध्येपण हे दोन वेगळे असल्याचें येथें सांगितलें आहे. तसेंच गांवकरी मंडळींत दिवाणकारकून धरलेले नाहींत हें येथें लक्षांत घेतलें पाहिजे. त्याप्रमाणेंच त्या कारकुनांबरोबर गांवांतील इतर सुखवस्तु व आगंतुक मंडळी ह्यांचीहि गांवकरी मंडळींत गणना नाहीं. हें निराळें सांगणें नको. अशांच्या कडील धर्मकृत्यें करणारास पुरोहित म्हणून संबो-

धिलें आहे. म्हणजे गांव–जोशी; गांव–उपाध्याय आणि कुलोपाध्याय असे येथें तीन प्रकार दर्शित होत आहेत. इतरत्र जोशी, ग्रामोपाध्ये व धर्माधिकारी असे तीन अधिकारी स्वतंत्र वा एकत्रहि असल्याचें आढळतें. (वतनपत्रें पृ. ६–१०) गांवकऱ्यां-खेरीज दिवाणकारकुनांकडे जोसपण करणारास ' दिवाणजोशी ' असें म्हटलेलें आहे. येथें कुलोपाध्याय म्हटला आहे तोच तो होय. 'धर्माधिकारी' म्हणून गांवांत वा प्रांतांत वेगळेंहि घराणें असे. ह्यालाच कोठें 'व्यवहारे जोशी' म्हटलें जात असावें घरोपाध्याय म्हणजे कुलोपाध्याय, ग्रामोपाध्याय, तीर्थोपाध्याय, राजोपाध्याय. ह्यांपैकीं राजोपाध्याय, हा कुलोपाध्यायच होय. प्रसंगीं मुहूर्त ज्योतिषी, आचार्यत्व म्हणून आणखी एक वृत्ति सांगितलेली आहे. निर्णयपत्रांत सोनाराकडील जोसपण हें ब्राह्मण जोशाकडे आहे असें स्पष्टपणें सांगितलें आहे. पण सोनाराचे घरचे उपाध्ये त्यांचे जातीचे असल्याचे शाहूरोज. पृ. १३७ वर आलें आहे. असो. निर्णयपत्रांत शेवटीं जो कोणी ह्या निवाड्यास चुकोन म्हणजे चुकवून म्ह० सोडून, हट्टीपणा व तंटा करील तो। ब्राह्मणद्रोही व राजद्रोही होय असें बज विलें आहे. फारसीमध्यें अंकलकोट व मराठींत अनुस्वाररहित अकलकोट असें आलें आहे. एके ठिकाणीं फारसींतील अनुकरणानें अंकलकोट असेंहि मराठींत आहे. पण फारसींत मात्र अंकलकोट असें फार आहे.

पत्रांतील विषयांसंबंधीं सांगितल्यानंतर प्रारंभीं म्हटल्याप्रमाणें ह्या निर्णयपत्रांतील लेखनपद्धतीबद्दल व निर्णयाच्या समर्थ्यर्थ जे अधिकारी सांगितले आहेत व ज्यामुळें राजद्रोही हा शब्द वर घातला आहे त्यासंबंधानें थोडक्यांत लिहिणें प्राप्त आहे. भांडणाची म्हणजे निर्णयाची बाब धार्मिक आहे व त्यासंबंध ची सभा धर्माधिकाऱ्यांचे घरीं झाली आहे. अर्थात् निर्णयाच्या साक्षीसंमतीदारांच्या यादींत अग्राधिकाऱ्यांचा मान धर्माधिकारी, शास्त्री, अग्निहोत्री, वैदिक ह्या भूदेवांच्याकडे आला आहे. व अशी मंडळी २७ आहेत. ह्यांच्या साक्षी सर्व बालबोधींत व ज्याच्या त्यानेंच केल्या आहेत. २७ पैकीं १०।१२ मंडळी कांहीं वेळानें आल्यासारखी दिसतात. कारण, १५ मंडळींच्या नांवांनंतर कारकुनांचीं नांवें लिहिण्यासाठीं ' कारकुनानी मामले मजकूर ' असें मधोमध शीर्षकहि लिहिलें, तरी ह्या शीर्षकापुढें व बाजूंस दाटीदाटीनें ह्या १२ ब्रह्मवृंदांचीं नांवें म्हणजे स्वाक्षऱ्या आल्या आहेत.

कारकुनांच्या यादींतहि २७ नांवें असून त्यांतील एकहि बालबोधींत लिहिलेलें नाहीं. कांहींना म्हणजे ठाणदार, मजमूदार, सरनोबत व नाजीर ह्या चौघांना मुद्राधिकार आहे आणि त्यांच्या मुद्रा त्यांच्या नांवापुढें उठविल्याहि आहेत. पण मजमूदार कामानिमित्त परगांवी म्हणजे स्वारीवर गेले होते. व बरोबर शिक्काहि नेला होता. म्हणून ह्या पत्रावर त्यांच्या करितां त्यांच्या गुमास्त्यानें साक्ष घातली आणि शिक्का उठविण्याच्या जागीं ' सिका स्वारी ' त असें लिहिलें.